00210

रजि.नं.अ.५५६ अ.नगर



येळकोट ! येळकोट !! जय मल्हार !!!

## ।। श्रीक्षेत्र कोरठण ।।

# श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट

मु. पो. पिंपळगाव रोठा, ता. पारनेर, जि. अहमदनगर - ४१४३०४
कार्यालय : (०२४८८) २८१२२८, २८१३०० मो.९८१९२६८४३४ मंदिर : (०२४८८) २८१३७० फॅक्स : (०२८८) २८१३००
Web : www.korthankhandoba.com E-mail : helpdesk@korthankhandoba.com

जावक क्र. ९३ दिनांक : ३१/०५/२०२३

प्रति,

मा. निलेश लंके साहेब

सदस्य, विधानसभा महाराष्ट्र राज्य

२२४, पारनेर - नगर मतदारसंघ

विषय - पर्यटन विभागा मार्फत श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान पिंपळगाव रोठा, ता. पारनेर जि. अहमदनगर येथील विकास कामांसाठी निधी मिळणे बाबत....

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपल्या माहितीसाठी कळविते की, महाराष्ट्रातील लाखों भविकांचे कुलदैवत आणि प्रति जेजुरी म्हणुन ओळखले जाणारे श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान पिंपळगाव रोठा, ता - पारनेर, जि - अहमदनगर हे राज्यस्तरीय ' ब ' वर्ग तीर्थ क्षेत्र म्हणून नावारूपास आले आहे. हे देवस्थान पर्यटकांना आकर्षित करते कारण हे देवस्थान घाट माथ्यावर आहे. येथे वार्षिक भाविक भक्त व पर्यटक लाखोंच्या संख्येने येतात. तसेच दररोज हजारो व दर पौर्णिमा व अमावस्या, मासिक उत्सवासाठी भाविक भक्त श्री क्षेत्र कोरठण खंडोबाला येत असतात तर यात्रा कालावधीत २५ ते ३० लाख भाविक भक्त श्री खंडोबा देवस्थान येथे येतात. देव दर्शनाला येणाऱ्या भाविक भक्तांच्या सुविधेसाठी, कार्यरत विश्वस्त मंडळाने प्राधान्य क्रमानुसार हाती घ्यावयाच्या विकास कामांचा आराखडा तयार केलेला आहे.

सदर आराखडा तयार करताना ट्रस्ट तर्फे येणाऱ्या भाविकांना व पर्यटकांना पुढील काळात आवश्यक सर्व सुखसुविधा मिळाव्यात या हेतूने श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान ट्रस्टने प्राधान्य क्रमाप्रमाणे तयार केलेल्या आराखड्यानुसार विकास कामांना खालील प्रमाणे आवश्यक तो निधी मिळणेस विनंती.

| अ. नं. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री क्षेत्र कोरठण खंडोबा ते अक्कलवाडी शिव - ३.५ कि. मी. | २ कोटी ५० लक्ष. |
| २ | खंडोबा फाटा ते भंडारा डोंगर - स्ट्रीट लाईट | ५० लक्ष. |
| ३ | भक्त निवास सुशोभीकरण | १ कोटी. |
| ४ | ४ जंबो हायमॅक्स | ५० लक्ष. |
| ५ | खंडोबा मंदिर परिसर सुशोभीकरण | १ कोटी. |
| ६ | नविन टॉयलेट बाथरूम | १ कोटी. |

तरी महोदय, श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान या तीर्थ क्षेत्राचे धार्मिक व ऐतिहासिक महात्म्य लक्षात घेता भाविक भक्तांच्या सुविधेसाठी करावयाच्या विकास कामांसाठी निधी मिळणेस योग्य त्या कार्यवाहीची सविनय विनंती.

अध्यक्ष
सौ.शालिनी अशोक घुले
श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट पिंपळगाव रोठा,
ता.पारनेर,जि.अहमदनगर